**ठळक बातम्या**

- विकसित भारतालाही वंदे मातरमची गरज असेल असं गृहमंत्री अमित शहा यांचं राज्यसभेत प्रतिपादन

- निवडणूक यंत्रणेत सुधारणा करण्याची सरकारची इच्छा नसल्याचा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा आरोप

- १० टक्के विमान उड्डाणं कमी करण्याचा केंद्र सरकारचा इंडिगो कंपनीला आदेश

- इंडोनेशियात कार्यालयाला लागलेल्या आगीत २२ जणांचा मृत्यू

आणि

- दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताची खराब सुरुवात

<><><><><>

स्वातंत्र्य लढ्यावेळीच नव्हे तर आज आणि २०४७मध्ये विकसित भारत झाल्यानंतरही वंदे मातरम या गीताची गरज भासेल, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. ते राज्यसभेत वंदे मातरम या गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विशेष चर्चेला प्रारंभ करताना बोलत होते.

**- - होल्ड... बाईट - अमित शहा - -**

दोन्ही सभागृहांमध्ये वंदे मातरम या गीतावरची चर्चा ही भावी पिढ्यांना या गीताचं महत्त्व समजण्यासाठी मदत करे, असं शहा म्हणाले.

स्वातंत्र्यलढ्यावेळी काँग्रेसने वंदे मातरम हेच ध्येय आणि घोषणा बनवली, असं प्रतिपादन राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी या चर्चेदरम्यान म्हणाले…

**- - होल्ड... बाईट- मल्लिकार्जुन खरगे - -**

यावेळी खर्गे यांनी भाजपावर टीका केली.

देशातल्या प्रत्येक राज्याचं एक राज्य गीत असून त्यानं वंदे मातरम या गीतापासून प्रेरणा घेतल्याचं माजी प्रधानमंत्री एच. डी. देवेगौडा यांनी सांगितलं. या गीताला

राजकारणाशी जोडू नका असं आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केलं.

<><><><><>

निवडणूक यंत्रणेत सुधारणा करणं फार सोपं आहे, पण सरकारला ते करायचं नाही, असा आरोप लोकसभेतले विरोधीपक्षनेते राहुल गांधी यांनी आज केला. लोकसभेत निवडणूक सुधारणांवरच्या चर्चेदरम्यान ते बोलत होते. निवडणुकीपूर्वी एक महिना आधी मतदार याद्या राजकीय पक्षांना द्याव्यात, मतदानाचं सीसीटीव्ही फुटेज नष्ट करण्याबाबतचा कायदा रद्द करावा, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची रचना कशी आहे, हे बघू द्यावं आणि निवडणूक आयुक्त पदावर असताना त्यांना कायद्यापासून संरक्षण देणारा कायदा मागे घ्यावा, अशा चार मागण्या त्यांनी सभागृहासमोर मांडल्या.

मतचोरी हे सर्वात मोठं देशद्रोही कृत्य आहे, कारण यामुळे देशाचा आत्मा, आधुनिक भारताचं स्वप्न भंग होतं, असंही ते म्हणाले. मतदार याद्यांचं विशेष सखोल पुनरीक्षण करण्यामागची कारणं निवडणूक आयोगानं सभागृहासमोर ठेवावीत, अशी मागणी काँग्रेस खासदार मनीष तिवारी यांनी चर्चेला सुरुवात करताना केली. अखिलेश यादव यांनी पुन्हा मतपत्रिकांवर निवडणुका घेण्याची मागणी केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अनिल देसाई यांनीही हीच मागणी केली. सुप्रिया सुळे यांनी निवडणुकांच्या दरम्यान होणारा भ्रष्टाचार आणि हिंसाचाराचा मुद्दा उपस्थित केला.

काँग्रेसचं सरकार असतानाही अनेकदा सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबवला गेला. तरीही विरोधक आता हा मुद्दा उपस्थित करत असल्याचं कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल म्हणाले. स्वातंत्र्यापासून सर्वांना मतदानाचा समान अधिकार देणाऱ्या मतदान यंत्रणेचं त्यांनी कौतुक केलं.

सर्व निवडणुकांसाठी एकच मतदार यादी असावी अशी मागणी शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली.

<><><><><>

देशातली नक्षलवादी चळवळ आकुंचन पावत असून केवळ अकरा जिल्ह्यांमधेच नक्षलवाद उरला आहे, यापैकी फक्त तीन जिल्ह्यांमधेच नक्षलवाद्यांचा जास्त प्रभाव आहे,

असं केंद्रीय गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी आज लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. २०१९ पासून २९ प्रमुख नक्षलवादी नेते सुरक्षा दलांच्या कारवाईत मारले गेले, सुरक्षा दलांसोबत लढण्याची त्यांची क्षमता कमी झाली आहे, त्यामुळे त्यांच्यासमोर शरण येण्याशिवाय कोणताही पर्याय उरला नाही, असं राय म्हणाले. मार्च २०२६ पर्यंत नक्षलवादी चळवळीचं समूळ उच्चाटन होईल, याचा पुनरूच्चारही त्यांनी यावेळी केला.

<><><><><>

तुकडेबंदी कायद्यातल्या जाचक अटी शिथिल करणारं विधेयक आज विधानसभेत मंजूर झालं. यामुळं सर्व जमीन धारकांची नावं सात बाऱ्यावर येतील आणि लहान भूखंडाची खरेदी विक्री सुलभ होईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

**- - - होल्ड - बावनकुळे - -**

या नवीन विधेयकामुळे आता विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा मंजूर असलेल्या क्षेत्रात वेगळ्या 'एनए' परवानगीची गरज भासणार नाही. त्याऐवजी 'एक वेळचे अधिमूल्य' भरून ही प्रक्रिया पूर्ण करता येईल, असं या विधेयकात स्पष्ट करण्यात आले आहे.

<><><><><>

इंडिगोच्या विमानसेवेत गेल्या आठवडाभरापासून निर्माण झालेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर कंपनीच्या विमान उड्डाणांच्या संख्येत १० टक्के कपात करायचे आदेश दिल्याची माहिती नागरी हवाई वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात दिली आहे. ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी कंपनीनं केलेल्या कामाची माहिती घेण्यासाठी इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांना आज पुन्हा एकदा मंत्रालयानं बोलावलं होतं. ६ डिसेंबरपर्यंत रद्द झालेल्या विमानांच्या तिकिटाची पूर्ण रक्कम प्रवाशांना परत दिल्याची, तसंच उर्वरित रक्कम आणि सामान परत करायची प्रक्रिया वेगानं पूर्ण करायच्या सक्त सूचना दिल्याची माहिती एल्बर्स यांनी यावेळी दिली.

दरम्यान, नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाचे संयुक्त सचिव मधुसूदन शंकर यांनी आज मुंबई विमानतळ टर्मिनल २ इथं भेट देऊन इंडिगोच्या विमानसेवेतल्या अनियमिततेने उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला.

<><><><><>

देशात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा, कौशल्यं आणि क्षमता विकसित करण्यासाठी मायक्रोसॉफ्ट कंपनी भारतात १ लाख ५८ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची योजना आखत आहे. मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांनी आपल्या समाज माध्यमावर ही माहिती दिली.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण एका गुंतवणूक योजनेची जाहिरात करत असल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर फिरत असून हा व्हिडिओ खोटा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीनं तयार केलेला आहे, अशी माहिती पत्र सूचना कार्यालयाच्या फॅक्ट चेक युनिटनं दिली आहे. अर्थमंत्री किंवा सरकारनं अशा प्रकारची कोणतीही योजना आणलेली नाही, किंवा तिची जाहिरात केलेली नाही, असंही पत्र सूचना कार्यालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

इंडोनेशियात राजधानी जकार्तामधे आज एका ड्रोन कंपनीच्या कार्यालयीन इमारतीला लागलेल्या आगीत किमान २२ जणांचा मृत्यू झाला. आज दुपारी ही आग लागली. अग्नीशामक दलाच्या शेकडो कर्मचाऱ्यांनी २९ बंबांच्या सहाय्यानं अथक प्रयत्न करुन ही आग आटोक्यात आणली. आतापर्यंत २२ जणांचे मृतदेह हाती लागले असल्याचं पोलिसांनी सांगितलं. १९ जणांना वाचवण्यात यश आलं, मात्र त्यांना, तसंच काही पोलीस आणि अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनाही श्वास घ्यायला त्रास होत आहे. आगीचं कारण अद्याप समजलेलं नाही.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आज ओदिशात कटक इथल्या बाराबती मैदानावर सुरु आहे.  दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. भारताची सुरुवात खराब झाली. सामन्यातल्या तिसऱ्याच चेंडूवर शुभमन गिल ४ धावा काढून बाद झाला. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १४ षटकात ५ बाद १०४ धावा झाल्या होत्या. लुंगी नगिदीनं ३ गडी बाद केले. भारताच्या एकाही फलंदाजाला अर्धशतक झळकवता आलेलं नाही.

पाच सामन्यांच्या या मालिकेतला दुसरा सामना येत्या गुरुवारी चंदीगडमधे, तिसरा सामना धर्मशाळा इथं, चौथा लखनऊमध्ये, आणि शेवटचा सामना अहमदाबादमधे होणार आहे.

<><><><><>

दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं आठव्या संशयिताला अटक केली आहे. दिल्लीच्या एका पथकानं डॉक्टर बिलाल नसीर मल्ला याला अटक केल्याची माहिती यंत्रणेच्या प्रवक्त्यानं आज दिली. या हल्ल्याच्या कटात मल्ला याचा सहभाग असून या प्रकरणातला संशयित उमर उन नबी याला त्यानं मदत केली, तसंच पुरावे नष्ट केले, असं एनआयएच्या तपासात समोर आलं आहे.

<><><><><>

ग्रँडमास्टर रमेशबाबू प्रज्ञानंद यानं फिडे सर्किट २०२५ स्पर्धेचं जेतेपद पटकावून २०२६च्या कँडिडेट्स टूर्नामिंटमधलं स्थान निश्चित केलं आहे. या स्पर्धेत प्रवेश मिळवणारा तो एकमेव भारताचा एकमेव पुरुष बुद्धिबळपटू आहे.

//<><><><><>//